# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय,

## राजगुरुनगर

## विद्यार्थी विकास मंडळ

## अहवाल

### 'व्हिजन डॉक्युमेंट २०४७' घोषवाक्य स्पर्धा

विद्यार्थी कल्याण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात 'व्हिजन डॉक्युमेंट २०४७' घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भारताच्या विकासाचे ध्येय, नवकल्पना, आत्मनिर्भरता, सामाजिक बांधिलकी आणि विकसित भारत २०४७ या संकल्पनांबाबत जागरूकता निर्माण करणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण १८ स्पर्धकांनी आपल्या सर्जनशील व प्रेरणादायी घोषवाक्यांद्वारे सहभाग नोंदवला. स्पर्धकांनी विकसित भारत, राष्ट्रीय एकात्मता, शाश्वत विकास, शिक्षण, विज्ञान आणि सामाजिक मूल्ये या विषयांवर प्रभावी घोषवाक्ये सादर केली.

स्पर्धेच्या माध्यमातून सहभागींच्या सर्जनशीलतेला वाव मिळाला तसेच भारताच्या विकसित राष्ट्राच्या संकल्पनेबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत झाली. सदर स्पर्धा विद्यार्थी कल्याण मंडळाच्या यशस्वी नियोजनातून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

प्रा. के.डी. मांडगे

विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी

साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय